## रे.क.न. १०१/2022 मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे दावा मिळकती मध्ये प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इसमानी हरकत व अडथळा करु नये अगर दावा मिळकतीतून वादींना हुसकावून लावू नये अशी प्रतिवादी विरुध्द दावेचे अंतिम निकालपावेतो तुर्तातुर्त मनाई आदेश पारित व्हावा अशी विनंती उक्त अर्जान्वये केली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन** –

०३. मौजे अंबर्डे, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील जमीन–

| अ.क्रं. | मिळकत नंबर | क्षेत्र | मिळकतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | १३८ | ४२ X १८ फुट लांबी रुंदीची | दगड, विट, मातीचे घर |
| २. | १४२ | १० X १२ फुट लांबी रुंदीची | दगड, विट, मातीचे शौचालय |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | १४५ | ७६ X ६५ फुट लांबी रुंदीची | पडसर मिळकत |

वर नमुद मिळकत ही या दाव्याचा वाद विषय होय त्याची चतुःसिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस – विठ्ठल सुतार यांची मिळकत

पश्चिमेस – दगडू पाटील सुळेकर यांची मिळकत.

दक्षिणेस – खालची गल्ली रस्ता.

उत्तरेस – अशोक सदाशिव बोरवणकर यांची मिळकत.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

## अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –

**०४.** वर नमुद दावा मिळकत ही वादी यांची वडीलोपार्जित मालकी वहिवाटची गावठाण हद्दीतील मिळकत आहे. वादी यांचे वडील गोविंद बोरवणकर यांनी सदर मिळकतीमध्ये साधारण १९७३ साली स्वतःस रहाणेकरीता घर बांधले होते. त्यानंतर वादी यांनी सन १९९५ मध्ये सदर घराचे पुन्हा डागडूजी करुन सध्या त्या घरामध्ये वादी राहणेस आहेत. वादीच्या सन १९७३ नंतर केलेल्या बांधकामाच्या नोंदी पूर्वीच ग्रुपग्रामपंचायतीकडे नोंद आहेत. दावा मिळकत गावठाण मध्ये असून तिचा सिटी सर्व्हे झालेला नाही. अंबर्डे गावची ग्रामपंचायत सन १९९२ साली

स्थापन झाली असून सदर स्थापनेपासून दावा मिळकतीच्या नोंदी ग्रामपंचायतीकडे असेसमेंट सदरी नोंद आहेत व त्याचा घरफाळा व कर वादी भरत आहेत.

**०५.** दावा मिळकतीमधील घराचे वादी सध्या रुफकाम दुरुस्तीस आले असून त्यामुळे घराचे पुर्नबांधणी करणेचे उद्देशाने वादी दावा मिळकतीमध्ये असणा–या घराची डागडूजी करत असताना प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नसताना स्थानिक राजकारणातून प्रतिवादी क्रं.१ यांनी वादीना दावा मिळकतीमध्ये घराची डागडुजी न करणेबाबत वादीशी वाद केला. प्रतिवादी क्रं. १ यांना वादींचे विरुध्द मनात द्वेष आहे. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ हे प्रतिवादी क्रं. २ ला हाताशी धरुन वादीना बेकायदेशीरपणे वेगवेगळयाप्रकारे त्रास देत असतात. वादी यांनी गावठाण हद्दीतील दावा मिळकत ही गायरान हद्दीत असलेचा चुकीचा अर्थ काढून तसा बनाव करुन प्रतिवादी क्रं.१ हे प्रतिवादी क्रं. २ चे मदतीने वादीना दावा मिळकतीमधील वादींचे मालकी वहिवाटीची मिळकत उपभोगणेस मज्जाव करत आहेत. दि. ११.११.२०२२ रोजी वादी दावा मिळकतीमध्ये घराचे समोर असलेल्या पडसर जागेमध्ये साफ सफाई करत असताना प्रतिवादी क्रं. १ यांनी दावा मिळकतीमध्ये येऊन वादींना बेकायदेशीरपणे हरकत व अडथळा करुन दावा

मिळकतीमधील घर मिळकत काढून घ्या अन्यथा आमचे ताकदीचे जोरावर व अधिकराचा गैरवापर करुन तुमची राहती घर मिळकत पाडून टाकतो अशी धमकी दिली.

**०६.** दावा मिळकत ही वादींची एकमेव रहाणेची मिळकत असून वादी हे सर्व कुटुंबियासह राहणेस आहेत. प्रतिवादी क्रं. १ गावचे सरपंच असलेने त्यांची आर्थीक परिस्थिती चांगली आहे व ते अंगबळाचे जोरावर व अधिकाराचा गैरवापर करनु वादीना दावा मिळकतीमधून हुसकावून लावून त्यांची रहाती घर मिळकत बेकायदेशीरपणे पाडून टाकणेचा खटाटोप प्रतिवादींनी चालविला आहे. त्यामुळे प्रतिवादीचे गैर कृत्याना आळा घालणेकरीता दावा मिळकतीमध्ये वादीचे कब्जे वहिवाटीला प्रतिवादीनी हकरत व अडथळा करु नये म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई होणे आवश्यक आहे. प्रतिवादी विरुध्द मनाई ताकीद न झालेस वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

**०७.** प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.१७ वर दाखल केले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा सदरचा अर्ज व कथने ही संपूर्ण चुकीची, खोटी व अधिकारबाहय, बेकायदेशीर असलेने तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाहीत.

**०८.** वादी अर्जात नमूद केलेली मिळकत ही कधीही वादी यांची वडिलोपार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत नव्हती व नाही. याउलट सदर ग्रामपंचायत मिळकत नं. १३८,१४२ व १४५ हया मिळकती गावठाणच्या हद्दीतील नसून महाराष्ट्र शासन व प्रतिवादी शासकीय संस्थेच्या आखत्यारितील गायरान हद्दीतील मिळकत आहे. त्यामुळे सदर मिळकतीशी वादीचा मालकी वहिवाटीशी काहीही संबंध येत नाही. वादी ज्या असेसमेंट कागदपत्राचे आधारे मालकी कब्जे वहिवाट सांगणेचा प्रयत्न करत आहेत तो फक्त कर आकरणी कागद असलेने त्याद्वारे कोणतीही मालकी हक्क व अधिकार प्राप्त होत नाही त्यामुळे वादी यांचा मनाई अर्ज खर्चासह नामंजूर होणेस पात्र आहे.

**०९.** अर्जात नमूद केलेप्रमाणे ग्रामपंचायत मिळकत नं. १३८,१४२ व १४५ पडसर जागा ही गायरानमध्ये येत असलेने आणि त्याची मालकी व सर्व हक्क, अधिकार शासन आणि प्रतिवादी संस्थेकडे आहे. वादी मिळकत ही प्रतिवादी तर्फे रितसर उप अधिक्षक भूमि अभिलेख पन्हाळा यांचेकडे दि. १०.०३.२०२२ रोजी दिले अंबर्डे गावचे हद्दीतील गायरान जमिनी संदर्भाने मोजणी होऊन हद्द निश्चित करणेकरिता दिले अर्जाचे अनुषंगाने संबंधीत शासकीय कार्यालयामार्फत दि. २०.०४.२०२२ रोजी झाले मोजणीअंती

मो.र.नं.५७९९ अन्वये गायरान जमिनीच्या हद्दीत येत असलेचे स्पष्ट झाले आहे.

**१०.** सदरचे क्षेत्र हे अतिक्रमित असलेने अलीकडेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीचे कामी मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी स्वंप्रेरित दाखल करुन घेतले अवमान याचिकेमध्ये दिले आदेशा प्रमाणे शासनाच्या आधीन राहून प्रतिवादीनी सदरचे अतिक्रमण निष्काशीत करणे संबंधाने मिळकत नं. १३८,१४२ व १४५ तसेच अन्य अतिक्रमित मिळकती रितसर नोटीस बजावली असता सदरची बाब मे. कोर्टापासून लपवून ठेऊन वादी स्वतःचे बेकायदेशीर कृत्य झाकू पहात आहे. सदर नोटीसीस बगल देणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज रक्कम रु. ५०,०००/– कॉस्ट बसवून नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**११.** वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | नकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | नकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१२.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ व २८ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१९–२३ करीता मिळकत क्रं. १३८ चा असेसमेंट उतारा | १८.११.२०२२ | स.शि.नक्कल |
| २. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१५–१९ करीता मिळकत क्रं. १३८ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ३. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००८–१२ करीता मिळकत क्रं. १३८ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००४–०८ करीता मिळकत क्रं. १४१ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ५. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०००–०४ करीता मिळकत क्रं. १३९ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ६. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन १९९७–०१ करीता मिळकत क्रं. १०१ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ७. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन १९९३–९७ करीता मिळकत क्रं. १४२ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ८. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१९–२३ करीता मिळकत क्रं. १४२ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ९. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१४–१८ करीता मिळकत क्रं. १४२ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १०. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००८–१२ करीता मिळकत क्रं. १४४ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| ११. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००४–०८ करीता मिळकत क्रं. १४५ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन १९९७–०१ करीता मिळकत क्रं. १०५ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १३. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१९–२३ करीता मिळकत क्रं. १४५ चा असेसमेंट उतारा | – | स.शि.नक्कल |
| १४. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०१४–१८ करीता मिळकत क्रं. १४५ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १५. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००८–१२ करीता मिळकत क्रं. १४५ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १६. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २००४–०८ करीता मिळकत क्रं. १४८ चा असेसमेंट उतारा | २१.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १७. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन २०००–०४ करीता मिळकत क्रं. १४५ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १८. | ग्रामपंचायत अंबर्डे यांचेकडी सन १९९३–९७ करीता मिळकत क्रं. १०२ चा असेसमेंट उतारा | १८.०५.२०२२ | स.शि.नक्कल |
| १९. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. २९९ चा १९८८ ते १९८९ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |

| | | | |
|---|---|---|---|
| २०. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९७७ ते १९८१ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| २१. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९७३ ते १९७७ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| २२. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९६९ ते १९७२ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |
| २३. | ग्रामपंचायत हरपवडे यांचेकडील मिळकत क्रं. ३१ चा १९६१ ते १९६२ चा असेसमेंट उतारा. | १५.०२.२०२३ | झेरॉक्स |

**१३.** प्रतिवादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. १६, २० व २३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत अंबर्डे तर्फे वकील नेमणुकीचा ठराव | २८.१२.२०२२ | झेरॉक्स |
| २. | प्रतिवादीतर्फे वादीस दावामिळकती संबंधाने दिली अतिक्रमणाची नोटीस–३ | १८.११.२०२२ | स.शि.नक्कल |
| ३. | वादी यांचे नांवे मौजे अंबर्डे, ता.पन्हाळा येथे असले शेत | ०५.०१.२०२३ | स.शि.नक्कल |

| | | | |
|---|---|---|---|
| | मिळकतीचा ८–अ उतारा. | | |
| ४. | भूमि अभिलेख पन्हाळा यांचे करवी मौजे अंबर्डे, ता.पन्हाळा गट नं. ४७ गायरान यांचा मोजणी करुन हद्दी कायम केले बाबतचे पत्र. | २५.०७.२०२२ | झेरॉक्स |

**१४.** वादी यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत

1. **<u>High Court on its own motion Vs. The State of Maharashtra through its Rural Development Departmetn., Suo Motu Publick Interest Litigation No.2 of 2022.</u>**

सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतले आहेत. तसेच वादीने दाखल केलेले फोटो सध्या विचारात घेण्यात येत नाहीत.

**१५.** प्रतिवादी यांनी त्यांच्या कथना पृष्ठयर्थ मा. वरिष्ठ न्यायालयांचे खालील न्यायनिर्णय दाखल केले आहेत

1. **<u>High Court on its own motion Vs. The State of Maharashtra and Ors, Suo Motu Publick Interest Litigation No.2 of 2022.</u>**

2. **<u>Jagpal Sing & Ors. Vs. State of Punjab & Ors, Supreme Court of India Civl Appel No.1132/2011 dated 28th January, 2011.</u>**

सदर न्यायनिर्णयांचे अवलोकन करुन या अर्जाचे आदेशावेळी सदर न्यायनिर्णय विचारात घेतले आहेत.

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्नबिंदू क्रं. १ करीता–</u>

**१६.** वादी हे तुर्तमनाई आदेश प्राप्त होण्यासाठी दावा मिळकती संदर्भाने त्याचा हक्क प्रथमदर्शनी सिध्द करतात का हे पाहणे गरजेचे आहे. वादीने दावा मिळकती या त्याच्या व<u>डिलार्जीत मालकी वहिवाटीच्या आहेत</u> असे कथन केले आहे.

**१७.** वादीने वहिवाट ही १९७३ पासून असल्याचे कथन केले आहे. त्याला अनुसरुन गाव नमुणा आठ उतारे (नि.क्रं.३ व २८) दावा मिळकती संदर्भाने विविध वर्षाचे दाखल केले आहेत. त्यावरुन वादीने दावा मिळकतीत त्याचे घरबांधकाम, शौचालय व पडीक जागा दर्शवली आहे. त्याविषयीचा घरफाळा / कर देखील ग्रामपंचायतीला भरलेला दिसतो.

**१८.** प्रतिवादीने त्याच्या नि.१७ च्या म्हणण्यामध्ये दावा मिळकतीचा ताबा वादीचा अतिक्रमित स्वरुपाचे असल्याचे कथन केले आहे. तसेच गाव

नमूना आठ जो ग्रामपंचायतीने जारी केला तो देखील नाकारत नाही. त्याविषयी त्याचे कथन आहे की, सदर दस्त हा कर भरणा दस्त आहे. त्याचा इतर कश्यासाठी वापर करता येणार नाही. या कथनावरुन व दस्तांवरुन दावा मिळकतीत वहिवाट वादीची दिसते.

१९. वादीची सदरची वहिवाट कोणत्या हक्काने हा मुळ वादाचा मुद्दा आहे. वादीने दावा मिळकत वडिलार्जीत मालकीची असल्याचे कथन केले आहे. तर प्रतिवादी दावा मिळकत ही शाासन मालकीची गायरान जमिन असल्याचे कथन करतात. ज्यावर वादीने अतिक्रमण केलेले आहे. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज मालकी व वहिवाट या दोन्हीबाबीवर अधारीत आहे. वहिवाट वादीची असल्याची कारणमिमांसा वर नमूद आहे. परंतु वादीने मालकी दर्शविणारा सकृतदर्शनी कोणताही दस्त दाखल केलेला नाही. गाव नमूना आठ हा उतारा करभरणा संदर्भाने आहे त्याचा फार–फार तर कब्जा दर्शविण्यासाठी विचार होतो परंतु सदर दस्त मालकी दर्शविणारा आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही. वादीने त्याच्या अर्जाची भिस्त ही वडीलार्जीत मालकी व वहिवाट दोन्हीवर ठेवलेली आहे. परंतु मालकीचा तसा पुरावा आजरोजी अभिलेखावर नाही.

२०. प्रतिवादीचे कथन आहे की, दावा मिळकत ही गायरानमध्ये

आहे. परंतु तसे दर्शविणारा गावठाण व गायरान मोजणी नकाशा प्रकरणात दाखल नाही. तसेच तो मुद्दा हा पुराव्याचा भाग राहील. सबब, दावा मिळकतीची मालकी कोणाकडे आहे याविषयी कोणतेही मत व्यक्त करण्यात येत नाही. प्रकरणात दाखल कागदपत्रावरुन वादीने मालकी बाबत सुस्पष्ट पुरावा या अर्जासाठी समोर न आणल्याने दावा मिळकतीची वादीची मालकी प्रथदर्शनी दिसत नाही. सबब, मुद्दा क्रं. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते.

**मुद्दा क्रं. २ व ३ करिता**–

**२१.** वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकतीवरील त्यांचा कब्जा संरक्षीत न केल्यास त्याच्यावर बेघर होण्याची वेळ येणार आहे. वादीने दाव्याचे कारण प्रतिवादीने दि. ११.११.२०२२ रोजी दावा मिळकतीत आले व दावा मिळकतीतील घर काढून घ्या असे म्हणाले व राजकीय दबाव असे दर्शविले आहे. परंतु दि. ११.११.२०२२ रोजी प्रतिवादी आल्या बाबत कोणताही प्रथमदर्शनी पुरावा समोर नाही. वादी दाव्यात प्रतिवादीने कोणतीही त्यांच्या विरुध्द नोटीस अथवा लेखी कार्यवाही अवलंबल्याचे करत नाही. सबब, वादी प्रथमदर्शनी केस शाबीत न करुन शकल्याने व दाव्याचे दर्शविलेल्या कारणा संदर्भाने प्रथम दर्शनी पुरावा नसल्याने वादीचे अपरिमित नुकसान दिसून येत नाही. सबब, न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने नाही. म्हणून प्रश्नबिंदू क्रं. २

व ३ नकारार्थी देण्यात येते.

**<u>प्रश्नबिंदू ४ करीता</u> –**

**२२.** प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात नसल्याने प्रश्नबिंदू क्र. ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात आला आहे.

२. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2023.03.23 17:41:41 +0530

(नेहा कों.नागरगोजे)

दि. २३.०३.२०२३. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कळे–खेरीवडे.